Ref. No.:ACC/TNE/Notice/61
Dt.:- 25/7/24

वि.प्र.म. चे

के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे

# नोटीस

## व्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी मोफत शिक्षण योजना.

मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या ९ जुलै २०२४ च्या पत्रानुसार, व्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजना महाराष्ट्र सरकारने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरू केलेली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा शंभर टक्के लाभ मिळणार आहे.

**महत्त्वाच्या अटी:**

१. व्यावसायिक उच्च शिक्षण घेणारी विद्यार्थिनी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असावी किंवा इतर मागासवर्ग घटकातील असावी किंवा शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास वर्गातील असावी.

२. विद्यार्थिनीने नवीन प्रवेश घेतलेला असावा किंवा जुना प्रवेश नूतनीकरण केलेला असावा.

३. व्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.

४. योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थिनीने संबधित योजनेचा फॉर्म विहित वेळेत भरणे आवश्यक आहे.

दिनांक : २२.०७.२०२४

JOSHI BEDEKAR COLLEGE OF ARTS & COMMERCE AUTONOMOUS V.P.M's. THANE

हुकुमावरून